# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

**दिनांक ०१.१०.२०२६ गुरुवार**

**मा. अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) कार्यालय येथे गुन्हेगारांचा आदान–प्रदान कार्यक्रम संपन्न :–:–**

मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाने नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे येथे अटक व मा. न्यायालयाकडून पोलीस कोठडी प्राप्त असणारे एकूण ५३ अटक आरोपींचे आदान–प्रदान हे दिनांक ३०.०९.२०२६ रोजी, मा. अपर पोलीस आयुक्त कार्यालय (दक्षिण प्रभाग), नागपुर शहर कार्यालय येथे पार पडले. आदान–प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत, याबाबत माहितीचे आदान–प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. श्री. वसंत परेदशी (दक्षिण प्रभाग), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहायक पोलीस आयुक्त (अजनी विभाग), मा. श्री. महेश चव्हाण, सहायक पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग) व मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहायक पोलीस आयुक्त (कळमना विभाग) हे उपस्थित होते. तसेच, एकूण १४ पोलीस ठाणे येथील आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील असे एकुण १३ अधिकारी व २३ अंमलदार हे ५३ आरोपींसह हजर होते. दिनांक १४.०७.२०२६ पासुन आजपावेतो एकूण ७३० अटक आरोपीतांना आदान–प्रदान मोहीमेकरीता हजर करण्यात आलेले आहे.

कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली समजून घेवुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचा डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा हजर ठाणे प्रभारी व तपासी अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या.



(कामगिरी)

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ३०.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०९ केसेसमध्ये ०९ ईसमावर कारवाई करून एकुण १,६६१/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायदा अन्वये ०३ केसेसमध्ये १६ इसमांवर कारवाई करून एकुण १,३४,७१०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ५६ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये १५ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ५५ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २८७ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ३६ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ४५ केसेस, ड्रायव्हींग विदाऊन युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०८ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ३७ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०४ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २१ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४बी(१) मोवाका अन्वये १३ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १०८८ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ०७ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १५ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,७७७ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ६,१०,०५०/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. २ पथकाची कामगिरी :— मकोकाचे गुन्ह्यातील पाहिजे आरोपीस अटक.**

दिनांक ११.०८.२०२६ चे २३.३० ते २३.४० वा. चे दरम्यान, इसम नामे शेख अकरम उर्फ भुरू शेख रहमान वय ४२ वर्षे रा. आनंद नगर, सिताबर्डी, नागपूर यास आरोपी १) शहबाज खान उर्फ सलमान खान वल्द बिल्ला अमजद खान २) अमीर बशीर शेख ३) मोहम्मद साहील अन्सारी मोहम्मद अल्ताफ अन्सारी ४) मोहम्मद तोफिक शेख मोहम्मद आरीफ शेख ५) शेख आरीफ शेख सलीम ६) शेख मोहसीन उर्फ बाबा टायगर शेख मुसा ७) जावेद खान उर्फ जेडी यांनी संगणमत करून, जुन्या वादाचे कारणावरून, त्यास ठार मारण्याचे उद्देशाने आरोपींनी त्यांचे ताब्यातील जीप कंपास कंपनीच्या चार चाकी वाहनाने धडक मारून गंभीर जखमी करून पळून गेले होते. फिर्यादी अरमान शेख अकरम शेख वय १९ वर्षे रा. आनंद नगर, सिताबर्डी यांचे तक्रारीवरून आरोपी विरूध्द कलम १०९,६१,२८१,१२५(अ)(ब) भा.न्या.सं. सहकलम १३४,१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा करण्यात आला होता. नमुद सर्व आरोपी हे टोळीचे सदस्य असुन, आरोपी क्र. ६ हा टोळी प्रमुख आहे. आरोपी हे निर्ढावलेले व अभिलेखावरील असुन, त्यांचेविरुध्द अनेक गुन्हे दाखल असल्याने, आरोपींविरुध्द कलम ३(१)(ii), ३(२),३(४) महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा— १९९९ (मकोका) अन्वये गुन्हा कलमवाढ करण्यात आली होती. यापुर्वी आरोपी क्र. १ ते ५ यांना अटक करण्यात आली असुन, तेव्हापासुन आरोपी क्र. ६ व ७ यांचा शोध सुरु होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हे शाखा युनिट २ चे अधिकारी व अंमलदार यांनी आरोपींचा पाठपुरावा करीत असता, तांत्रिक तपास करून व आरोपींचा शोध घेवून, पाहिजे आरोपी शेख मोहसीन उर्फ बाबा टायगर शेख मुसा, वय ३० वर्षे, रा. ताजनगर, मानकापूर, नागपुर हा अकोला परिसरात असलेबाबत मिळालेल्या

माहितीवरुन, तेथे शोधकामी रवाना झाले. आरोपी हा नागपूर येथे रेल्वेने येत असलेबाबत सुचना मिळाल्याने, गुन्हे शाखा युनिट २ चे अधिकारी व अंमलदार यांनी शिताफीने शेगाव रेल्वे स्टेशन येथे सापळा रचून त्यास ताब्यात घेतले. नमुद आरोपीस अटक करुन पुढील कार्यवाहीस्तव सोनेगाव पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.,

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री वैभव जाधव, सपोआ, गुन्हेशाखा यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख, सपोनि. चेतन बोरखडे, पोहवा. महेंद्र सडमाके, अर्जुन यादव, कमलेश गनेर, चापोहवा कमलेश गहलोत, पोअं. संदीप पांडे यांनी केली.




**<u>३) गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पथकाची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ३०.०९.२०२६ चे २१.५० वा. ते ०१.१०.२०२६ चे ०१.०५ वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना पोलीस ठाणे अजनी हद्दीतील शताब्दी नगर चौक ते ओंकार नगरकडे जाणाऱ्या रोडचे कडेला एका पिंपळाचे झाडाजवळ, ब्लॅक पिंक केक दुकानाचे जवळ एक इसम संशयीतरित्या दिसुन आला. त्याचे जवळ जात असता, तो पोलीसांना पाहून पळून जाण्याचे तयारीत असतांना, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव अब्दुल शिराज अब्दुल गफ्फार, वय ३८ वर्षे, रा. हलदारपुर, सुखरपाडा जि. कटक (ओडीसा), ह.मु.— घर क्र. १०४, काशिनगर, शताब्दी चौक, अजनी, नागपूर असे सांगीतले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, त्याची अंगझडती घेतली असता, त्याने घातलेल्या ग्रे रंगाचे पॅन्टचे खिशात झिपलॉक पन्नीमध्ये एकुण ११.१६० ग्राम एम.डी. पावडर मिळून आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०१ मोबाईल, रोख १५००/—रू. असा एकुण ४४,९८०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने नमुद एम.डी. पावडर ही त्याचा साथीदार पाहीजे आरोपी नामे राहुल रा. चंद्रपुर आणि डेविल रा. चंद्रपुर या दोघांचे मदतीने विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपी हा स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगताना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे अजनी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव अजनी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे दोन्ही आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री वैभव जाधव, सपोआ, गुन्हेशाखा यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. श्री दर्शन पाटील, सपोनि. शिवाजी ननवरे, पोहवा. सुशिल बहिरे, पोअं. नितीन वासने, कुणाल बोडखे व चापोअं. कमलेश क्षिरसागर यांनी केली.



**४) गुन्हेशाखा, युनिट ०१ पोलीसांची कामगिरी :— दारुची अवैध वाहतुक करणाऱ्या आरोपीविरुध्द गुन्हा दाखल, एकुण ११,२०,४८०/— रु. चा मुद्येमाल जप्त.**

दिनांक ३०.०९.२०२६ चे २१.३० वा. ते २२.५० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट ०१ चे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, एका सिल्व्हर ग्रे रंगाची स्कार्पियो गाडीने वर्धा ते नागपूर हायवेवरुन दारूसाठ्याची अवैध वाहतुक केली जात आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे हिंगणा हद्यीत, नागपूर—वर्धा हायवेरील सोल रुफटॉप हॉटेल समोर सापळा रचुन, प्राप्त वर्णनाची स्कार्पिओ गाडी क्र. एमएच २० डिजे ४७४० दिसुन आल्याने तिला थांबविले. पंचासमक्ष वाहनचालकाचे नाव पत्ता असता, त्याने त्याचे नाव योगेश गणेश आकोडे, वय ३४ वर्ष, रा. प्लॉट क्र. ८४, आखरी बस स्टॉप हुडकेश्वर, नागपूर असे सांगितले. त्याचे ताब्यातील वाहनाची झडती घेतली असता, त्यामध्ये देशी भिंगरी संत्रा नंबर एक लेबल असलेले १० बॉक्समध्ये एकुण १००० बॉटल्स, रॉयल चॅलेंज १८० मिलीच्या एक बॉक्समध्ये ४८ बॉटल्स, मॅजिक मोमेंटस् १८० मिलीच्या ०१ बॉक्समध्ये ४८ बॉटल्स, रॉयल स्टॅग १८० मिलीच्या ०२ बॉक्समध्ये ९६ बॉटल्स्, रॉयल स्टॅग ९० मिलीच्या ०१ बॉक्समध्ये ९६ बॉटल्स मिळुन आल्या. आरोपींचे ताब्यातुन नमुद दारुसाठी, ०१ मोबाईल फोन व स्कार्पिओ कार असा एकुण ११,२०,४८०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूध्द पोलीस ठाणे हिंगणा येथे कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंदविला आहे. आरोपीस मुद्देमालासह हिंगणा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र परदेशी, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शानाखाली, पोनि. प्रशांत ठवरे, पोहवा. मनोज टेकाम, प्रितम यादव, नितीन वासनिक, रितेश तुमडाम व पोअं. कुणाल गेडाम, मालोजी धुडगुंडे, पंकज ठवकर, चापोअं. नितीन बोपुलकर व मंगेश बोरकुटे यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे नंदनवन :—अग्निशस्त्राने चालते गाडीतुन हवेत फायर करणाऱ्या आरोपीविरुध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०१.१०.२०२६ चे ०१.३० वा. चे सुमारास, फिर्यादी आबिद खान मोहम्मद खान, वय ४८ वर्ष, रा. हसनबाग, नागपूर हे त्यांचे दुचाकी वाहनाने आपले घरी जात असतांना, पोलीस ठाणे नंदनवन हद्यीतील हसनबाग चौक, डीएल मोटर्स दुकानाजवळून फ्लायओव्हरचे खालुन वळण घेत असतांना, त्यांना त्यांचे समोरुन एक क्रेटा कार क्र. एमएच ४९ डीए ३३९९ जातांना दिसली. नमुद गाडीचालकाने खिडकीतुन हात बाहेर काढून त्याचे जवळील अग्निशस्त्राने हवेत फायर करुन, नमुद वाहन हे वेगात हसनबाग चौकाकडे निघुन गेले.

अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. निलेश दळवी यांनी नमुद क्रेटा कारचालक आरोपीविरूध्द कलम ३,२५,२७(१) भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. अग्नीशस्त्राने हवेत फायर करणाऱ्या क्रेटा चालक आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे तहसील :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ३०.०९.२०२६ चे १९.५० वा. चे सुमारास, तहसील पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत टिमकी दादरा पुल रेल्वे पटरीजवळ, नाल्याचे बाजुला काळी टिशर्ट व सिमेंट रंगाचा फुलपॅन्ट घातलेला एक इसम शस्त्र बाळगुन फिरत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अरमान खोकर उर्फ सोनु उर्फ केडी वल्द अलीमुद्यीन खोकर, वय २९ वर्षे, रा. भानखेडा, छोटी मस्जिदजवळ, तहसील, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत लपविलेला एक लोखंडी चाकु किंमती ५००/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे तहसील येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**